**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**कॉम्प्रिहेन्सिव थॅलासेमिया केअर, बालरोग रक्तदोष – कर्करोग आणि**
**बोन मॅरो ट्रान्सप्लान्टेशन केंद्र, बोरीवली (पू)**
**(लो.टि.म. वैद्यकीय महाविद्यालय व सर्वसाधारण रुग्णालय, शीव, मुंबई यांचे उपकेंद्र)**

**क्र. एलटीएच/१०६६/सीटीसी** **दि. १८/०२/२०२६**

# जाहिरात

मनपा – कॉम्प्रिहेन्सीव थॅलासेमिया केअर, बालरोग रक्तदोष–कर्करोग आणि बोन मॅरो ट्रान्सप्लान्टेशन केंद्र, बोरीवली (पू) येथील अति विशेष सेवा, सुविधा व उपचार केंद्राकरिता खालील नमूद केलेली पदे तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी दि. ३०.११.२०२६ पर्यंतच्या कालावधीकरिता दर ६ महिन्यांनी एक दिवस तांत्रिक सेवा खंड सापेक्ष भरावयाची आहेत.

विहीत नमुन्यातील अर्ज मनपाच्या **http://www.mcgm.gov.in** तसेच या रुग्णालयाच्या **https://www.ctcphobmt.com** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. इच्छुक उमेदवारांनी पदासाठी रु. ७९० + १८% GST इतके अर्ज शुल्क आणि सर्व बाबीची पूर्तता केलेले अर्ज, सर्व प्रमाणपत्रांच्या स्वंय साक्षांकित छायांकित प्रती, अलीकडेच काढलेले पासपोर्ट छायाचित्र त्यावर चिकटवून मनपा– सीटीसी, पीएचओ आणि बीएमटी सेंटर, बोरीवली (पू), मुंबई ४०००६६ येथे **दि. २०/०२/२०२६ ते दि. ०५/०३/२०२६ पर्यंत** कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी (शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टी वगळून) स.१०.०० ते दु. ०१.०० पर्यंत भरून द्यावे. अपूर्ण अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत.

| अ. क्र. | कंत्राटी तत्वावरील पदाचे नाव | अर्हता | वयोमर्यादा (कमाल वर्ष) | पद संख्या | ठोक वेतन दरमाह (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | विकृतीशास्त्रज्ञ (पूर्णवेळ) | एमडी / डीएनबी (पॅथोलॉजी) किंवा एमसीआय मान्यताप्राप्त समकक्ष पदवी | ५० वर्ष | १ | १,१२,०००/– |
| २ | क्ष–किरण तंत्रज्ञ | १. उमेदवार १२ वी नंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत चालविला जाणारा क्ष–किरण विषयातील बी. पी. एम. टी. (Bachelor in Paramedical Technology in Radiology) हा पूर्णवेळ ३ वर्षाचा पदवी अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेला असावा व त्याने ६ महिन्याचे इंटर्नशीप पूर्ण केलेली असावी.<br>२. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची विज्ञान शाखेची भौतिकशास्त्र या मुख्य विषयासह पदवी परीक्षा (B.Sc. In Physics) उत्तीर्ण झालेला असावा व डायग्नोस्टिक सेंटर /रुग्णालय येथील क्ष–किरण विषयक कामाचा २ वर्षाचा अनुभव असावा.<br>किंवा<br>३. उमेदवार हा १२ वी नंतर मान्यताप्राप्त संस्थेकडून /विद्यापीठातून रेडीओग्राफी ही पदविका (Diploma in Radiography) उत्तीर्ण असावा व डायग्नोस्टिक सेंटर /रुग्णालय येथील क्ष–किरण विषयक कामाचा २ वर्षाचा अनुभव असावा. | ३८ वर्ष | १ | २०,०००/– |
| ३ | माहिती तंत्रज्ञ | बीएससी परीक्षेत माहिती तंत्रज्ञान विषय घेऊन उत्तीर्ण होणे आवश्यक किंवा<br>माहिती तंत्रज्ञानामध्ये डिप्लोमा आणि या क्षेत्रातील हॉस्पीटल मधील १ वर्ष काम केलेल्याचा अनुभव.<br>तसेच सीसीएनए आणि एमसीएसइ प्रमाणपत्र असलेल्यांना प्राधान्य देण्यात येईल. | ३८ वर्ष | १ | ३३,०००/– |
| ४ | अफेरेसिस टेक्निशियन | बी.एससी डीएमएलटी, एफडीए मान्यताप्राप्त तंत्रज्ञ प्रमाणपत्र अनिवार्य.<br>अफेरेसिसच्या मधील अनुभवास प्राधान्य दिले जाईल. | ३८ वर्ष | १ | २२,०००/– |

**टिप – अनु क्र. २ व ४ वरील पदाकरिता विभागामार्फत व्यावसायिक चाचणी (Trade Test) घेण्यात येईल, तसेच सदर पदाकरिता MSCIT असणे आवश्यक.**

**सर्वसाधारण अटी व शर्ती :**

सर्वसाधारण अटी व शर्ती मनपाच्या **http://www.mcgm.gov.in** तसेच मनपा– सीटीसी, पीएचओ आणि बीएमटी सेंटर, बोरीवली (पू) केंद्राच्या **https://www.ctcphobmt.com** या संकेतस्थळावर देण्यात आली आहे.

**विशेष सूचना:**

१. सदर निवड प्रकिया कुठल्याही वेळी स्थगित करण्याचे अधिकार हे मा. महानगरपालिका आयुक्त यांना राहतील.

२. यापूर्वी संबंधित कार्यालयात व अन्य ठिकाणी सादर केलेले/प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुसऱ्या संस्थेला अर्ज विकणे, स्वीकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही याची कृपया नोंद घ्यावी.

३. टपालाने / कुरिअरने / ई–मेलद्वारे आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

४. पात्र उमेदवारांच्या मुलाखती संबंधी ठिकाण, दिनांक व वेळ मनपा– सीटीसी, पीएचओ आणि बीएमटी सेंटर, बोरीवली (पू) केंद्राच्या **https://www.ctcphobmt.com** या संकेतस्थळावर देण्यात येईल.

| सही/– | सही/– | सही/– | सही/– |
|---|---|---|---|
| **डॉ. संतोष खुडे**<br>**उप संचालक**<br>**मनपा–सीटीसी, पीएचओ आणि बीएमटी केंद्र** | **डॉ. रत्ना शर्मा**<br>**संचालक**<br>**मनपा–सीटीसी, पीएचओ आणि बीएमटी केंद्र** | **डॉ. प्रमोद इंगळे**<br>**अधिष्ठाता**<br>**लो.टि.म.स. रुग्णालय** | **डॉ. शैलेश मोहिते**<br>**संचालक**<br>**(वै.शि.व प्र.रु.)** |

**वेळेत निदान, वाचवी प्राण** **PRO/3024/ADV/2025-26**

Mahabharti.in